## वसंत कानेटकर यांची नाट्यसंपदा

**नाटके**

अखेरचा सवाल
अश्रुंची झाली फुले
आकाशमिठी
इथे ओशाळला मृत्यू
इथे गवताला भाले फुटतात
एक रूप अनेक रंग
कधीतरी कोठेतरी
कस्तुरीमृग
गगनभेदी
गाठ आहे माझ्याशी !
गोष्ट जन्मांतरीची
घरात फुलला पारिजात
छूमंतर
तुझा तू वाढवी राजा
देवांचं मनोराज्य
दोन ध्रुवांवर दोघे आपण
नलदमयंती
पंखांना ओढ पावलांची
प्रिय आईस....
प्रेमाच्या गावा जावे
प्रेमा तुझा रंग कसा?
बेइमान
मला काही सांगायचंय
मत्स्यगंधा
मदनबाधा
माणसाला डंख मातीचा
मीरामधुरा
मोहिनी
रायगडाला जेव्हा जाग येते
रंग उमलत्या मनाचे
लेकुरे उदंड झाली
वादळ माणसाळतंय
विषवृक्षाची छाया
वेड्याचं घर उन्हात
शल्य
सुख पाहता
सूर्याची पिल्ले
सोनचाफा
हिमालयाची सावली

**एकांकिका**

आनंदीबाई आणीबाणी पुकारतात
गड गेला पण सिंह जागा झाला
झेंडेपाटील महाविद्यालयात गंगू, अंबू, विठा
दिव्यासमोर अंधार
मद्याशीने केला मराठी भ्रतार
व्यासांचा कायाकल्प
स्मगलर सम्राटांच्या न्यायालयात रामशास्त्री

# गाठ आहे माझ्याशी !

वसंत कानेटकर

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

## पहिल्या आवृत्तीचे निवेदन

'गोष्ट जन्मांतरीची' या नाटकानंतर जवळ जवळ दीड वर्षानंतर 'गाठ आहे माझ्याशी' रसिक प्रेक्षकांना चंद्रलेखा सादर करीत आहे. या नाटकाची गुंफण करताना, दहापंधरा वर्षांपूर्वी महाराष्ट्रात गाजलेल्या एका खटल्याच्या हकीकतीचा पार्श्वभूमीसाठी मी वापर केला आहे. माणुसकी आणि वकिलांची व्यावसायिक नीती यांचा मर्मभेद करीत असतानाच न्यायालयांची खेळणी करणारे राजकीय पुढारी आणि त्यांचे हस्तक झालेले साखर कारखानदार यांचेही जळजळीत वास्तव चित्रण करण्याचा मी या नाटकात प्रयत्न केला आहे. मात्र इथे कोणतीही व्यक्ती मला अभिप्रेत नाही. माझा रोख प्रवृत्तीवर आणि ढासळत चाललेल्या सामाजिक मूल्यांवर आहे.

या नाटकाच्या लेखनात मला माझे परमस्नेही ॲड. नरेंद्र कामत तसेच ॲड. शिरीष गुप्ते, श्री. अधिक शिरोडकर, श्री. राजगुरू देशमुख, यांनी बहुमोल मदत केली. नाटकाच्या दिग्दर्शनातच नव्हे तर बांधणीतही प्रा. मधुकर तोरडमल आणि निर्माते मोहन वाघ यांनी अपरंपार साहाय्य केले. या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. 'चंद्रलेखे'ने या नाटकाचा उभा केलेला दिमाखदार प्रयोग आणि श्री. परचुरे यांनी केलेले या पुस्तकाचे देखणे प्रकाशन याबद्दलही मी मनःपूर्वक आभारी आहे. या नाटकातील दोन कविता 'प्रेम कोणावर करावे' आणि 'मला वाटते' माझे ज्येष्ठ स्नेही कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या असून त्यांचा त्यांनी नाटकात उपयोग करण्याची मला परवानगी दिली याबद्दल मी कृतज्ञ आहे.

**वसंत कानेटकर**

# नांदी

[ पडदा दूर होतो तेव्हा रंगमंच मिट्ट काळोखात आहे. क्षणार्धाने काळोखातच एक बादशाही खुर्ची अस्पष्ट दिसू लागते. या खुर्चीवर कोणी एक गृहस्थ ऐटीत रेलून बसला आहे. चेहरामोहरा काहीच दिसत नाही. दृष्टी अंधाराला सरावल्यावर खादीचे पायघोळ धोतर, झब्बा, जाकीट, डोक्यावर गांधी टोपी तेवढी दिसू लागते. पण तत्पूर्वीच गृहस्थ अंधारातच प्रेक्षकांना उद्देशून बोलू लागतो. ]

**गृहस्थ :** सावधान ! विनाकारण अस्वस्थ होऊ नका. ही आपली भेट अंधारातच नियोजित करण्यात आली आहे. माझ्याच आदेशावरून. त्यामुळं इतक्यात तरी तुम्हाला इथं काहीही दिसायचं नाही. काही दिसायची वा पाहायची गरजही नाही. तूर्त मला तुमचे डोळे नको आहेत. फक्त कान हवे आहेत कान. माझा प्रत्येक शब्द तुम्ही लक्षपूर्वक ऐकला पाहिजे आणि वेळ येईल तेव्हा माझ्या सगळ्या आज्ञा तुम्ही काटेकोरपणे पाळल्या पाहिजेत. मी केवळ तुमच्या भल्यासाठी या आडमार्गात शिरतोय याची जाण ठेवा. एरवी ते फासेपारधी आणि तुम्ही गावकरी हवा तो गोंधळ घातलात तरी मला त्याचं सोयरसुतक काही नाही. फासेपारध्यांना जन्माची अद्दल घडून त्यांना जरब बसायची तर इलाजही तसा जालीमच करायला हवा. सरकार-दरबारी केलेल्या तक्रार अर्जांची विल्हेवाट कशी लागते ते तुम्ही पाहिलंच आहे. म्हणून— एक घाव, दोन तुकडे. मी सांगेन त्या बरहुकूम; स्वतःची फाजील अक्कल न चालवता; ठरल्या दिवशी ठरल्या वेळी; थोडीशी गफलत, किंचितशी कसूर, जराशी ढिलाई— आणिक मामला फिस्कटेल. डाव अंगाशी येईल. माझ्या नव्हे ऽऽऽ, तुमच्या. माझे दूत सगळीकडे डोळ्यात तेल घालून फिरताहेत. माझं बारीक लक्ष चौफेर आहे. मी मुंबईला किंवा दिल्लीला असलो तरी माझी खबर पक्की आहे. दगाबाजांची तर हाडे पिचतीलच पण चुकारांचीही गय केली जाणार नाही. गावातला घरटी एक

एक माणूस तरी वेळेवर बाहेर धावला पाहिजे. भाला, फरशी, कुऱ्हाड, तलवार, रामपुरी— निदान लोखंडी कांबी वा काठी घेऊन. मला नुसती रिकाम्या हातांच्या बाजारबुणग्यांची धावाधाव आणि फाजील चौकस बघ्यांची गर्दी नकोय. मामला सफाईनं झटपट उरकणारे कडवे असामी उतरले पाहिजेत. इतर तपशील तुम्हाला योग्य वेळी कळेल. पण सगळे फासेपारधी एकजात ठेचून ठार करायचे आहेत— बायका-पोरांसुद्धा सगळ्या झोपड्यांची राखरांगोळी झाली पाहिजे. विरुद्ध साक्ष द्यायला एकदेखील हरामजादा जिता राहता कामा नये. या बदमाशांनी उभ्या गावाचा जेवढा छळ केलाय त्याचा पुरेपूर बदला घेतला गेलाच पाहिजे. पोलिसांची डर बाळगू नका. ते मध्ये पडायचे नाहीत. निदान ' ऑपरेशन फासेपारधी ' होऊन जाईपर्यंत तरी ते उगवणार नाहीत. तुम्ही मात्र मागे रेंगाळू नका. काम झालं की मागल्या पावली दाही दिशांनी अंधारात नाहीसे व्हा. सगळी शस्त्रं नाहीशी करा. मग चालू दे हवा तितका वेळ पोलिसांचा घोळ. चौकशीला कोणी आलाच तर आळीमिळी गुपचिळी. प्रत्येकाचे हात कानावर. दुढ्ढाचार्यपणानं कोणी वाचाळपणा केला तर त्याची जीभ हासडली जाईल.

हां ऽ— आणिक एक सक्त इशारा देऊन ठेवतोय. फासेपारध्यांच्या तळावर दंगल उसळल्याची वार्ता पसरताच, अर्ध्या तासावरून उठून तो धावत येईल. ' तो ' म्हणजे कोण ते लक्षात येतंय का ? होय... होय... तोच सर्वोदयी गांधाळ नामदेवराव खेडकर. तो येऊन निवारू लागला, किंवा आडवा आला तर सरळ उचलून बाजूला धरून ठेवा. त्याला तुमच्याकडून काही इजा होता कामा नाही. दंगल चालू असताना ' नामदेवराव खेडकर की जय ! 'चा नारा पुनः पुन्हा गर्जायला हवा. तुमचं काम उरकून तुम्ही चालू लागा. नामदेवरावचा पक्का समाचार पोलीस घेतील. त्याच्या लीडरबाजीची पक्की खोड मोडायचीय मला. पण ती परस्पर. एका प्रदेशात दोन पुढारी नांदू शकत नाहीत हा धडा नामदेवरावाला शिकवायची वेळ आता आलीच आहे. तो व्यूह सगळा पक्का ठरलाय. या सगळ्यांत कच्चा दुवा एकच आहे. तुम्ही लोक. तुम्ही लोक बेभरवशाचे आहात. म्हणून तर येथवर वाकडी वाट करून येणं मला भाग पडलं. पुन्हा एकदा बजावतो !

मी खबरदार आहे. माझी प्रत्येकावर नजर आहे.

आणिक लक्षात ठेवा— गाठ माझ्याशी आहे !

[ संपूर्ण काळोखात रंगमंच बुडून जातो आणि— ]

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ मुंबई. खार-सान्ताक्रूज-विलेपार्लेसारख्या एका उपनगरीतील एक जुनाट बंगला. सुमारे साठ वर्षांपूर्वी त्या वेळचे प्रख्यात हायकोर्ट वकील भवानीशंकर दयार्णव बुद्धिसागर यांनी बांधला. भवानीशंकरांच्या पश्चात त्यांचे पुत्र बॅरिस्टर शेषराव यांची हयात याच बंगल्यात गेली आणि आता शेषरावांच्या मागे त्यांचे चिरंजीव विश्वजित वकिली मोठ्या तोलामोलाने संभाळतात. सगळ्याच बुद्धिसागरांनी कोर्टात अमाप यश व पैसा मिळवला. पहिले दोन बुद्धिसागर काळाच्या पडद्याआड नाहीसे झाले— बऱ्या-वाईट आठवणी आणि आख्यायिका मागे ठेवून. तिसरे बुद्धिसागरही मध्यम वयाकडे झुकले, पण अद्याप तरी ते लग्नाच्या फंदात पडलेले नाहीत.

' लग्नाच्या फंदात ' म्हणायचं कारण या वास्तूला कोणाचा तरी, कसला तरी, शाप भोवतो आहे, असा एक सार्वत्रिक समज आहे. भवानीशंकरांच्या बायकोने एकुलत्या एक मुलाच्या जन्मानंतर अवघ्या वर्षभरात विहिरीत उडी घेऊन जीव दिला. त्यानंतर भवानीशंकरांनी लग्नच केले नाही. शेषराव त्यांच्या अंगाखांद्यावरच वाढले. शेषरावांचे योग्य काळी लग्न झाले. त्यांना दोन वर्षांच्या अंतराने दोन मुले झाली. थोरली मनूताई आणि धाकटा विश्वजित. विश्वजित सुमारे तीन वर्षांचा असतांना शेषरावांची बायको मुलांना टाकून कोणा पक्षकाराबरोबर पळून गेली. तिचे पुढे काय झाले कोण जाणे. योग्य वयात मनूताईचे लग्न झाले. पण तिचा नवरा व्यसनी आणि मारकुटा निघाला म्हणून मनूताई जी माहेरी आली ती पुढे इथेच राहिली. पुढे शेषराव वारले. विश्वजितने त्यांची वकिली उचलली. अशा-अशात त्याने परितशी ओलांडली तरी त्याने लग्न केले नाही— म्हणून लोक म्हणतात की, बुद्धिसागरांच्या वास्तूला कोणाचा तरी, कसला तरी तळतळाट भोवतो आहे.

आता या घरात विश्वजित, मनूताई ही घरातली आणि जुना घरगडी पठ्ठे आणि म्हातारे कारकून बुवा ब्रह्मचारी, ही घरातल्यासारखीच माणसे राहतात. तर अशा या घरातली एक सायंकाळ. बंगल्यातला दर्शनी हॉल. हॉलच्या रंगरूपावरून इथे

कोणी रसिकराज षौकीन श्रीमंत माणूस राहात असावा असे वाटते. बसायची आसने, दारावरले पडदे, शोकेस, फुलांची रचना, पेंटिंग्ज, पुतळे, रेडियोग्रॅम, टी. व्ही., कवितांच्या पुस्तकांचे कपाट वगैरे वगैरे. या अजबखान्यात सगळ्यात पुढे पण एका बाजूला एक छोटे चौकोनी टेबल ठेवले आहे व त्यावर बुद्धिबळाचा पट मांडून ठेवला आहे. पटावर, अर्धवट डाव झाल्याप्रमाणे, वेगवेगळ्या जागी मोहरी पडून आहेत.

पडदा वर जाऊन रंगमंच प्रकाशाने उजळतो, त्या वेळी या टेबलापाशी पठ्ठे उभा आहे. दोनचार बुटांचे जोड बाजूला टेवून त्यातल्या एका बुटाला पॉलिश करीत पण टेबलावरील पटावर नजर लावून पठ्ठे हातवारे करीत आणि पुटपुटत उभे आहे. मधेच एकदोनदा काही मोहरी मागेपुढे सरकवून तो काहीएक अंदाज घेतो आणि मग ती पुन्हा जागच्या जागी ठेवतो. तेवढ्यात बाहेरून भाजीची पिशवी हातात घेऊन लगबगीने मनूताई आत येतात. मनूताई चाळिशीच्या घरात आलेल्या. उदास सोशीक मुद्रा. ]

**मनूताई** : ( चपला काढता काढता ) पठ्ठे, विश्वजित आला का रे कोर्टातून !
**पठ्ठे** : ( नजर पटावरच ) नाही ताईसाहेब.
**मनूताई** : आणि बुवासाहेब ?
**पठ्ठे** : तेही नाही आले. तेही साहेबांच्या बरोबरच येणार.
**मनूताई** : इतक्यात काही फोन आला होता का विश्वजितचा ?
**पठ्ठे** : छे छे, फोन बीन काही नाही ताईसाहेब.
**मनूताई** : ( पुढे होऊन खिडकीतून वाकून पाहात ) सत्यशीलजींच्या बंगल्यावर परस्पर तर गेला नाही ना विश्वजित ?
**पठ्ठे** : छा छा ऽ ऽ ! भलतंच काय ताईसाहेब ? साहेब आज कोर्ट उठलं की थेट घरी येणार.
**मनूताई** : का ? कोर्टात जाताना तो तुला सांगून गेला होता तसं ?
**पठ्ठे** : छे. मला कसचे सांगून जातात ? पण कोर्टात जायच्यापूर्वी डावच असा जमून आलाय ताईसाहेब, की साहेब घरी धावलेच पाहिजेत,– काम संपलं रे संपलं की !
**मनूताई** : ( पाहात ) बाई बाईऽ ऽ, हद्द आहे हो तुझ्यापुढं पठ्ठे. अजून तू इथं नुसता बुद्धिबळंच खेळत उभा राहिला आहेस ?
**पठ्ठे** : छा छाऽ ऽ हा ' खेळ ' नाही ताईसाहेब. साहेब बंगल्यावर परतल्यावर मग खेळ सुरू होईल. ही ही मी आपली नुसती स्ट्राटेजी करून बघतोय...... मनातल्या मनात.
**मनूताई** : स्ट्रॅटेजीऽ ऽ !



**पठ्ठे** : म्हणजे ' पेच ' ताईसाहेब. बुद्धिबळातला.
**मनूताई** : ते कळलं मला. पण विश्वजितबरोबर बुद्धिबळं खेळत बसायला तुला काही लाज वाटत नाही ? तो तुझ्याबरोबरीचा आहे का ? त्याची बुद्धी केवढी, तुझी अक्कल काय, त्याचा मानमरातब केवढा, आपण कुठं आहोत, याचा खेळ खेळताना पोच ठेवायला नको ? विश्वजित आता काय शाळकरी मुलगा राहिलाय ?
**पठ्ठे** : अहो ताईसाहेब, हा काही मी खेळ खेळत नाहीये. ही माझी ड्यूटी चाललीय ड्यूटी.
**मनूताई** : ड्यूटी ? पपांनी तुला त्या वेळी बंगल्यावर नेमून घेतला तो काय–
**पठ्ठे** : ताईसाहेब, पपांच्या वेळचं या बंगल्यावर आता काही शिल्लक राहिलंय का ? हा रेडियोग्रॅम, ही शेरशायरीची बुकं, ही पेंटिंग्ज, हे पुतळे, ही फुलं... यातली एक तरी चीज थोरल्यासाहेबांच्या वेळी होती ? मालक बदलले, तेव्हा सगळं बदललं.
**मनूताई** : पण म्हणून काही कामं बदलली नाहीत.
**पठ्ठे** : नाही ना– ( हातातला बूट दाखवीत ) त्यावेळपासूनची ही कामं तर चुकत नाहीतच, पण नव्या जमान्यात पटावरली ही प्यादी माझ्या मानगुटीला बसली आहेत. काय करायचं ? " खेऽ ऽ ळ "– म्हटलं की असेन तेथून धडपडत खेळायला धावलंच पाहिजे.
**मनूताई** : त्या थापा माझ्यापुढं मारू नकोस. तुला देखील उनाडायला हवंच असतं. आता मीच एकदा विश्वजितला वडिलकीनं ठणकावून सांगणारच आहे की—
**पठ्ठे** : सांगा, सांगा ताईसाहेब. तुम्हीच सांगा. तुम्हीच चांगलं वडिलकीनं नीट समजावून सांगा साहेबांना. म्हणावं– " अरे बाळा, पठ्ठे हा एक घरातला फालतू गडीमाणूस. तुझ्यासारख्या मशहूर वकिलानं त्याच्याबरोबर बुद्धिबळं खेळणं, तीही अशी उघड्यावर, बरं नाही. हा पठ्ठे सारखा येता जाता तुझ्यावर मात करतोय, चारचौघात तुझं नाक कापतोय, हे– हे पत्रकारांनी पाहिलं तर राजा तुझी काय शोभा राहिली बरं ? "
**मनूताई** : हे– हे असं मी विश्वजितला सांगू ? इतका गर्व चढलाय तुला आपल्या हुशारीचा ?
**पठ्ठे** : गैरसमज करून घेऊ नका ताईसाहेब. अहो साहेबांची तल्लख हुशारी तर अख्खी दुनिया जाणते. पण ती कोर्टात. फिर्याद चालवताना. कायदेकानूच्या बाबतीत. इथं बुद्धिबळाच्या रंगणात नाही.
**मनूताई** : एकदा विश्वजितपुढं बोलून दाखव तुझं हे शहाणपण.
**पठ्ठे** : बोलून कशाला दाखवायला हवं ? त्यांचे ते पक्के ओळखून आहेत मनात.

म्हणून तर खेळायला सुरवात करताना मला माऽरे दमात घेतात. "... आज तुला देशोधडीला लावतो... भर रस्त्यातून तुझी आज धिंड काढतो... तुझं पेकाट मोडून तुला खुरडायला लावतो... यंव करतो आणि त्यंव करतो..." आणि खेळ संपायच्या वेळी ? पाऽऽर चुपचाप. न बोलता पसाऽऽर !

[ तेवढ्यात बाहेरून विश्वजित आणि बुवासाहेब बोलत बोलत आत येतात. त्यांचा आवाज ऐकताक्षणीच "बापरेऽऽ! साहेब आले" असे उद्गारत पठ्ठे लगबगीने बूट उचलून जागेवर ठेवण्यासाठी धावतो. तेवढ्यात विश्वजित आणि बुवा ब्रह्मचारी आत येतात.

विश्वजित पस्तिशीचा उमदा तरुण. नखशिखान्त वकिलीच्या साहेबी वेशात. दिसायला देखणा पण मुद्रा सतत तंग आणि उग्र. डोळे टपोरे पण थिजलेले. हालचालीत नेहमीच कमालीची अस्वस्थता. बुवासाहेब ब्रह्मचारी हे कधीकाळी भिक्षुक असावेत. विश्वजितच्या वडिलांनी त्यांना कारकून बनवले. आता कारकुनीत पुरते मुरलेले.

**बुवासाहेब** : रावसाहेब, आपला काही तरी घोटाळा होतोय.

**विश्वजित** : घोटाळा वगैरे काही नाही बुवासाहेब. हा त्या पेंटरचा आगाऊपणा आहे. त्यानं तुम्हाला बनवलं आणि तुम्ही बनलात. ]

**बुवासाहेब** : ( प्रवेशतात ) तसं नाही रावसाहेब—

**विश्वजित** : ( पाठोपाठ येत, हातातील ब्रीफकेस आसनावर टाकीत ) नाही काय ? रंग द्यायला त्यानं सुरवात करायपूर्वी तुम्ही लोकांनी मला का नाही विचारलंत ? नाही त्या भिकार गोष्टीत शंभर वेळा येऊन माझं डोकं खाता आणि बंगल्याला बाहेरून रंग कोणता द्यायचा—

**बुवासाहेब** : ते विचारलं होतं साहेब. आपण निळा म्हणालात म्हणून—

**विश्वजित** : नुसता निळा नाही. मी स्काय ब्ल्यू म्हटलं होतं.

**मनूताई** : विश्वजित, आल्या आल्या तुला भडकायला झालं काय एवढं ?

**विश्वजित** : बंगल्याचा रंग. दुसरं काय ? अगं मनूताई, त्या पेंटरला मी स्काय ब्ल्यू कलर दे म्हणून सांगितलं होतं तर या बुवासाहेबांनी—

**मनूताई** : ( फणकाऱ्याने ) हे पहा विश्वजित, इतक्या बारीक सारीक बाबतीत स्वतःचे आग्रह ठेवायचे असले तर माणसांनी प्रत्येक बाबतीत स्वतः जातीनं लक्ष घालावं. उगाच दुसऱ्याला बोल लावू नये.

**विश्वजित** : ( माघार घेत ) मनूताई, अग मी तुला कुठं बोल लावतोय ? मी या बुवासाहेबांना म्हणत होतो की—

**मनूताई** : ( रागाने ) बुवासाहेबांना तरी का म्हणून ? स्वतः घरात इकडची काडी तिकडे करायची नाही. उंबऱ्यात पाऊल पडतंय केव्हा आणि बुद्धिबळं



खेळायला उभा राहतोय कधी— यासाठी जिवाची घालमेल. बुद्धिबळं संपली की रेडिओ नाहीतर रेकॉर्डप्लेयर. गोहरजान, मलकाजान, खानसाहेब नाही तर पंडितजी— तयार आहेत कळ दाबली की ठणठणाट करायला. दोन घास गिळले आणि हातावर पाणी पडलं की सत्यशीलच्या बंगल्यावर शेरशायरीचा धुमाकूळ—

**विश्वजित** : असं नाही मनूताई—

**मनूताई** : चल्, काही एक बोलू नकोस. विश्वजित, तुला सांगून ठेवते, मी नवऱ्याला सोडून आलेली बायको, तुझी थोरली बहीण आहे म्हणूनच तुझ्या घरात राहिले बघ. एरव्ही तुझी लग्नाची बायकोदेखील तुझं हे वागणं बघून आपल्या आईसारखी पळून तरी गेली असती नाही तर आपल्या आजीसारखा मी एक तरी वाक्या

**विश्वजित** : कुठलं बोलणं मनूताई कोठपर्यंत ताणतेस ? शब्द बोललोय का ? काय बुवासाहेब ? काय रे पठ्ठे ?

**मनूताई** : आता कशाला तोंड उघडील तुझा पठ्ठे ? तो बसलाय कधीचा छूटेजी रचून बुद्धिबळाच्या रंगणात तुझी वाट पाहात. आपल्याबरोबर घरातल्या नोकराचाकरांचीही शिस्त पार बिघडून टाकलीस तू.

**विश्वजित** : म...म...मीऽऽ ? मी काय बुवा कोणाची शिस्त बिघडवली ?

**मनूताई** : पपांनी त्या काळी या पठ्ठेला लहान मुलगा म्हणून नेमून घेतला आणि आपल्या कडक शिस्तीत वाढवला. त्या वेळी टाप होती का या पठ्ठेची या हॉलमध्ये अशी बुद्धिबळं मांडून ठेवायची ? वर मेला तोंड करून मलाच शहाणपणा सांगतोय आणखी.

**विश्वजित** : कोण ? हा हा पठ्ठे ? तुला शहाणपणा म्हणजे ? ( गुरकावून ) हरामखोराऽ—

**पठ्ठे** : ( घाबरून ) नाही...नाही साहेब...

**मनूताई** : आता उगीच त्याच्यावर गुरकावू नकोस. आपलं वागणं अगोदर सुधार. ( जायला वळत ) मी चहा करून आणतेय. तोपर्यंत कुठंही बाहेर जायचं नाही. ( आत जातात. )

**विश्वजित** : छे छे......आता आपल्याला मुळी कुठं बाहेर जायचंच नाही. बुवासाहेब, दोन नंबरचा स्विच ! [ पठ्ठे जाऊ लागतो तशी—] बुवासाहेब म्हणजे बुवासाहेब. पठ्ठे नव्हे. [ बुवासाहेब तत्परतेने भिंतीतल्या स्विच-बोर्डावरील एक स्विच दाबतात तशी रविशंकरची सतार ऐकू येऊ लागते. ] व्हॉल्यूम एकदम कमी ! [ बुवासाहेब आणखी एक कळ फिरवून व्हॉल्यूम कमी करतात. दरम्यान पठ्ठे तत्परतेने एक खुर्ची आणून ठेवतो. विश्वजित खुर्चीवर बसत पाय पुढे करतो. पठ्ठे बूट पायमोजे काढू लागतो. विश्वजित सहज पटावरली मोहरी न्याहाळू लागतो. तशी ते लक्षात येऊन— ]

**पठ्ठे :** ( हळूच ) साहेब, सकाळी आपण कोर्टात गेलात त्या वेळी डाव होता तस्साच आहे.

**विश्वजित :** तुझी काय माय व्यालीय मी नसताना पटावर हलवाहलव करायची ! अरे हा पट उधळून टाकून, हाच डाव मी जसाच्या तसा पुन्हा मांडून दाखवीन— केवळ स्मरणातून…समजलास ? बुवासाहेब, बाहेर ऑफिसमध्ये जा आणि सकाळी सांगितलेली पत्रं शिवरामनं टाइप केलीत की नाही ते पाहा. कोणाचा फोन आला तर परस्पर तिकडंच घ्या. अर्जंट काही असेल तर मला रिंग द्या. आता दुकानाच्या फळ्या बंद. पक्षकार वगैरे कोण्णी नाही.

**बुवासाहेब :** होय रावसाहेब. ( जातात.)

**विश्वजित :** हूं ऽऽऽ ! [ पठ्ठे बूट पायमोजे काढण्यातच मग्न आहे हे पाहून पुन्हा एकदा ] हूं ऽऽऽ ! ( क्षणभर थांबून ) हूं ऽऽऽ ! पठ्ठे मी 'हूं ऽऽ' म्हणालो. तीनदा. काय कान आहेत की बिळं आहेत ?

**पठ्ठे :** ( गडबडून ) डाव पुढे चालू करायचा साहेब ?

**विश्वजित :** मग ? मी काय तुझ्यापुढं आरती ओवाळून घ्यायला बसलोय ?

[ त्या बरोबर पठ्ठे— "तयारी साहेब" असे उद्गारत चटकन् वळून आपली खेळी खेळतो. पहिल्या छुट विश्वजितचा उंट उडवून आपला घोडा त्या जागी टेवीत, क्षणमात्र न थांबता तो बूट ठेवण्यासाठी आत पळतो. विश्वजित क्षणभर चकित होत डावातील ही पडझड न्याहाळत राहतो. तेवढ्यात पठ्ठे सपाता घेऊन पुन्हा येतो आणि विश्वजितच्या पायात सरकवतो. मग तो त्याला कोट आणि शर्टाची गळपट्टी काढायला मदत करू लागतो. हे चालले असतानाच— ]

**विश्वजित :** चांडाळा, आपल्या घोड्यानं तू माझा उंट मारलास ?

**पठ्ठे :** ( काम करताना थंडपणे ) होय साहेब.

**विश्वजित :** ( डाव न्याहाळत ) आणि दुष्टा, आता हत्तीनं माझा वजीर ठेचायचा तुझा बेत आहे ?

**पठ्ठे :** तुम्ही वजिराला मागे घेतला नाहीत तर नक्कीच.

**विश्वजित :** म्हणजे कपटी माणसा, मी वजीर मागे घेतला की तू माझा दुसरा उंट गारद करणार.

**पठ्ठे :** सरळच आहे ते.

**विश्वजित :** ( डाव पाहात ) थांब, थांब… तेवढंच नाहीय. अरे चोरा ऽऽ ! पठ्ठ्या, तू एक नंबरचा इरसाल दगाबाज इसम आहेस. कट कारस्थान रचण्याच्या आरोपाखाली तुला आठ दिवस पोलिसांच्या लॉकपमधेच लटकावला पाहिजे.

**पठ्ठे :** ( भोळी मुद्रा करून ) काय झालं साहेब ?



**विश्वजित :** इथून पुढल्या चौथ्या डावात तू माझ्यावर मात करण्याचा व्यूह रचला आहेस. ( दरडावून ) खरं आहे की नाही ?

**पठ्ठे :** खरं आहे साहेब.

**विश्वजित :** हरामखोरा, मी कोर्टात गेलो म्हणजे आपलं काम टाकून तू इथं उभा राहतोस आणि फक्त पुढल्या डावपेचांचा विचार करीत बसतोस !

**पठ्ठे :** काम टाकून नाही साहेब, काम करता करता आणि त्यासाठी सतत इथं उभं राहायची गरज नसते साहेब. डोक्यात हा पट सदैव मांडून ठेवलेलाच आहे साहेब.

**विश्वजित** ( थक्क होत ) आं ? काय म्हणालास ?

**पठ्ठे :** ( जाण्यासाठी वळत ) साहेब हा पट कोणीही उधळून टाकला तरी मी तो पुन्हा मांडू शकतो, जसाच्या तसा— केवळ स्मरणातून. [ कोट घेऊन आत पळतो. विश्वजित चक्रावून बघतच राहतो. क्षणार्धात पठ्ठे कपडे घेऊन येतो आणि— ] साहेब, हा आपला झब्बा, आणि हा पायजमा—

**विश्वजित :** ( उसळून, हिसकावून घेत, भिरकावीत ) फेकून दे गटारात… ( त्याचे मनगट पकडीत ) काय रे लुच्चा, पुढले चार चार डाव डोळ्यापुढं ठेवून खेळी खेळायची ही अक्कल कोणी शिकवली तुला ? अं ? कोण गुरू भेटला तुला ?

**पठ्ठे :** आपणच साहेब.

**विश्वजित :** मी ऽऽऽ? ( उलगडा पडून, खुलून, मनगट सोडीत ) हां हां ऽऽ म्हणजे जिमखान्यात टूर्नामेंटस्‌मधला माझा गेम पाहिला आहेस तू.

**पठ्ठे :** ( भिरकावलेले कपडे उचलून झटकीत ) नाही साहेब. म्हणजे त्याचं काय आहे साहेब, कोर्टात साक्षीदाराची क्रॉस घेताना आपण कसे—चौथा प्रश्न मनात धरून त्या दिशेनं पहिला प्रश्न विचारता… ( मुद्रा पाहात ) न—नाही म्हणजे कपडे बेडरूममध्ये ठेवून येतो.

**विश्वजित :** आधी थांब. पठ्ठ्या, माझी क्रॉस ऐकायला कोर्टात कधी आला आहेस तू ?

**पठ्ठे :** कोर्टात नाही आलो कधी साहेब, पण घरी, बाहेर ऑफिसात, साक्षी-दारांना नाही तर पक्षकारांना तुम्ही कसे पढवता ते—

**विश्वजित :** ते काम टाकून तू ऐकत बसतोस ? हरामखोरा—

**पठ्ठे :** ( जाता जाता ) काम टाकून नव्हे साहेब, काम करता करता.

[ पठ्ठे आत पळून जातो. विश्वजित त्याच्या मागे धावणार तेवढ्यात बाहेरच्या उघड्या दारातून पंडित सत्यशील उमराणीकर प्रवेशतात. मुद्रा प्रक्षुब्ध. सत्यशील एक नामवंत कवी आणि स्फोटक पत्रकार. चाळिशी ओलांडलेला